
अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## ई वार्ता

## नोव्हेंबर २०२२




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २५०१/२०२२

# मफुकृवि ई वार्ता

नोव्हेंबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २३, नोव्हेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी


## इंद्रधनुष्य-२०२२ युवक महोत्सवाचे शानदार उद्‌घाटन








**दि. ५ नोव्हेंबर, २०२२.** इंद्रधनुष्य-२०२२ या महोत्सवाचे व्यासपीठ युवकांसाठी फार महत्वाचे आहे. यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वतःचे कलागुण व्यासपीठावर दाखविण्याची संधी मिळते तसेच स्वतःमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी व्यासपीठ मिळते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री तथा अहमदनगर व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे इंद्रधनुष्य-२०२२ हा १८ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवक महोत्सवाचे आयोजन दि. ५ ते ९ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी लोणेरे ता. माणगाव, जि. रायगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, चित्रपट अभिनेते श्री. भारत गणेशपुरे, कार्यकारी परिषद सदस्य डॉ. प्रदिप इंगोले, श्री. दत्तात्रय उगले, श्री. तुषार पवार, श्री. दत्तात्रय पानसरे, इंद्रधनुष्य २०२२ चे समन्वयक व माजी राज्यसंपर्क अधिकारी डॉ. प्रमोद पाब्रेकर, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार,विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान उपस्थित होते.

ना. राधाकृष्ण विखे पाटील यावेळी बोलतांना पुढे म्हणाले की कृषि विद्यापीठांनी जगातील पहिल्या पन्नासमध्ये असणाऱ्या विद्यापीठांशी सामंजस्य करार करावेत. कृषि क्षेत्रातील सर्व महत्वाच्या स्टार्टअपमधून उर्जा देण्याचा प्रयत्न व्हायला हवा. यातील तंत्रज्ञान लोकांनी स्विकारले पाहिजे. तुमचे, तुमच्या कुटुंबाचे व समाजाचे भविष्य तुमच्या खांद्यावर असून ते पुर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करा असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले की या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपली पूर्ण ताकद लावून निश्चित केलेले ध्येय कठोर परिश्रम करुन साध्य करा. राहुरी कृषि विद्यापीठाने संपूर्ण देशामध्ये जास्त बियाणे तयार करण्याचा विक्रम केलेला आहे. त्याचबरोबर देशामधील पहिले ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. देशी गाय संवर्धनाचा प्रकल्प पुणे येथे सुरू झालेला असून असून वेगवेगळ्या देशांबरोबर सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित असलेले चित्रपट अभिनेते श्री. भारत गणेशपुरे आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशुन

म्हणाले की आपले ध्येय सुरुवातीलाच निश्चित करा व ते पुर्ण करण्यासाठी कठोर मेहनत करा. तुमच्या ध्येयावर लक्ष ठेवा, आनंदात जगा व आपल्या मस्तीत रहा. ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही करत असलेली मेहनतच तुम्हाला यशापर्यंत घेवून जाईल. जो स्वतःला ओळखतो तोच जगात यशस्वी होतो असा कानमंत्र त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

या कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. डॉ. प्रमोद रसाळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रमोद पाब्रेकर यांनी इंद्रधनुष्य स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ. कारभारी काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी इंद्रधनुष्य-२०२२ या माहितीपुस्तीकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. महावीरसिंग चौहान यांनी कवितेच्या स्वरुपात आभार मानले. सूत्रसंचालन सौ. विणा दिघे यांनी केले. या युवक महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील २१ विद्यापीठांमधील ८०० पेक्षा जास्त विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी झालेले आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या युवक महोत्सवात हे विद्यार्थी वेगवेगळ्या २८ इव्हेंटद्वारे त्यांचा कलाविष्कार सादर करणार आहेत. या कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. चंद्रशेखर कदम, माजी विद्यापीठ कार्यकारी सदस्य ॲड. तानाजी धसाळ, श्री. नामदेव ढोकणे, ॲड. सुभाष पाटील, कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार, श्री. रावसाहेब तनपुरे तसेच राजभवनातील डॉ. गोविंद कतलाकुटे, डॉ. संतोष परचुरे, डॉ. वाणी लातुरकर, डॉ. विठ्ठलराव नाईक व डॉ. चितोडे तसेच सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. मिलिंद अहिरे व डॉ. साताप्पा खरबडे हे अधिकारी उपस्थित होते.

## इंद्रधनुष्य-२०२२ कार्यक्रमाचा समारोप जल्लोषात संपन्न







**दि. ९ नोव्हेंबर, २०२२.** जीवनात चढ उतार येत असतात पण प्रयत्नात सातत्य ठेवले तर यश आपलेच असते. यशाने कधीही हुरळुन जाऊ नये व अपशय आले तर मनाने खचुन जाऊ नये असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे इंद्रधनुष्य-२०२२ हा १८ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवक महोत्सवाचे आयोजन दि. ५ ते ९ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत करण्यात आले होते. या महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. गणेश शिंदे, प्रवरा वैद्यकीय विज्ञान संस्थेचे कुलगुरु डॉ. व्ही.एन. मगरे,

इंद्रधनुष्य २०२२ चे समन्वयक व माजी राज्यसंपर्क अधिकारी डॉ. प्रमोद पाब्रेकर, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. दिलीप पवार, डॉ. मिलिंद अहिरे, डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. चिंतामणी देवकर, डॉ. राजेंद्र सुर्यवंशी, डॉ. अतुल अत्रे, राजभवनातील डॉ. गोविंद कतलाकुटे, डॉ. संतोष परचुरे, डॉ. वानी लातुरकर, डॉ. विठ्ठलराव नाईक व डॉ. चितोडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पाटील आपल्या भाषणात बोलताना पुढे म्हणाले की, हा इंद्रधनुष्य कार्यक्रम मा. राज्यपालांनी आमच्यावर विश्वास ठेवून आयोजनाचा मान आमच्या विद्यापीठाला दिला. हा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आमच्या सर्व अधिकाऱ्यांनी तसेच कर्मचाऱ्यांनी चांगल्या पद्धतीने काम करून हे इंद्रधनुष्य पेलण्याचे काम केले आहे. डॉ. सावंत यावेळी म्हणाले की इंद्रधनुष्य यासारख्या कार्यक्रमांमधूनच अनेक कलाकार आपल्याला मिळाले आहेत. तुमच्यामध्ये जे कौशल्य आहे ते ओळखून तुम्ही तुमचे भविष्य घडवले पाहिजे. तुमच्यातील कलागुण ओळखुन त्यातुन तुमची कारकिर्द घडवू शकता. श्री. शिंदे आपल्या भाषणात म्हणाले की, श्रीकृष्ण व त्याचे जीवन आपण समजून घेतले पाहिजे. श्रीकृष्ण आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर कधीही निराश झाला नाही. त्याने त्याच्या जगण्याचा उत्सव केला. त्याप्रमाणे तुम्ही आपल्या जीवनाचा उत्सव करा. आपण आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतः कष्ट करून नोकरीच्या पाठीमागे न लागता उद्योगांमध्ये स्वतःचे भविष्य घडवता आले पाहिजे. कुलगुरू डॉ. मगरे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बक्षिस वितरणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते पार पडला. यामध्ये मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकविले तर सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पटकविला. गोल्डन बॉयचा पुरस्कार पुणे विद्यापीठाच्या अथर्व ओंकार वैराटकर याने तर गोल्डन गर्लचा पुरस्कार मुंबई विद्यापीठाची रिया धनंजय मोरे हिने पटकविला. यावेळी मुख्ये पाच प्रकारांमध्ये सर्वसाधारण विजेतेपद देण्यात आले. यामध्ये संगीत प्रकारात सर्वसाधारण विजेतेपद सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांनी पटकविले तर नृत्य, वाङ्मयीन कलाप्रकार, रंगमंचीय कला, ललीतकला या प्रकारात मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकविले. याप्रसंगी २९ कला प्रकारांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिसांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. डॉ. पाब्रेकर यांनी इंद्रधनुष्य–२०२२ या स्पर्धेबद्दल तसेच स्पर्धेतील विविध घटक तसेच परीक्षक, सहभागी विद्यापीठे, सहभागी विद्यार्थी याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात कुणाल बेंद्रे, किमया रणदिवे या विद्यार्थीनी तसेच कोल्हापूर येथील क्षितिजा ताशी, अकोला येथील डॉ. वृषाली देशमुख, जळगांव येथील डॉ. विजय लोहार व मुंबईचे डॉ. सुनील पाटील या संघ व्यवस्थापकांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. महावीरसिंग चौहान यांनी कवितेच्या स्वरुपात आभार मानले. सूत्रसंचालन सौ. विणा दिघे यांनी केले. बक्षिस वितरणाचे वाचन डॉ. वानी लातुरकर आणि डॉ. अतुल अत्रे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले कृषि विद्यापीठ गीताने झाली तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

मफुकृवि ई वार्ता
नोव्हेंबर २०२२



## महात्मा फुले कृषि विद्यापीठात भारतीय मृद विज्ञान संस्थेचे ८६ वे वार्षिक अधिवेशनाचे आयोजन






**दि. १५ नोव्हेंबर, २०२२.** जमिनीच्या आरोग्यावर आपले आरोग्य अवलंबून आहे. जर जमीन व्यवस्थीत असेल तर आपले आरोग्य चांगले असेल. आपल्या सुवर्ण भविष्यासाठी शाश्वत मृद व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन नवी दिल्लीच्या भारत सरकारचे कृषि संशोधन आणि विस्तार विभागाचे सचिव तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशू पाठक यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागातर्फे भारतीय मृद विज्ञान संस्थेचे ८६ वे वार्षिक अधिवेशन दि. १५ ते १८ नोव्हेंबर, २०२२ दरम्यान, राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठात आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ऑनलाईन मार्गदर्शनात डॉ. हिमांशू पाठक बोलत होते. याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या, नवी दिल्ली येथील नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन विभागाचे उपमहासंचालक डॉ. सुरेशकुमार चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी नवी दिल्ली येथील भारतीय मृदा विज्ञान सोसायटीचे अध्यक्ष डॉ. डी.आर. बिश्वास, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, धारवाड कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.एल. पाटील, नवी दिल्ली येथील भारतीय मृदा विज्ञान सोसायटीचे सचिव डॉ. के.के. बंडोपाध्याय, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे व भारतीय मृदा विज्ञान संस्थेचे राहुरी चाप्टरचे अध्यक्ष व संयोजन सचिव डॉ. बापूसाहेब भाकरे उपस्थित होते.

डॉ. चौधरी आपल्या भाषणात म्हणाले की आपल्या देशातील शेतीसाठी खत व्यवस्थापन ही मोठी समस्या असून मागच्या वर्षी १५ दशलक्ष टन रासायनिक खतांचा वापर शेतीसाठी करण्यात आला. सरकारच्या डोक्यावर रासायनिक खतांच्या सबसीडीचा जवळ जवळ दोन लाख करोडचा बोजा आहे. आपल्याला शेतीचे रासायनीक खतावरील अवलंबीत्व कमी करावे लागणार आहे. त्यासाठी जैविक खतांचे प्रमाण आवश्यक त्या प्रमाणात वाढवावे लागेल. कुलगुरू डॉ. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की जमीन ही आपल्याला मातेसमान असून अनेक जीवजंतूबरोबरच आवश्यक सुक्ष्मजीवांचे अस्तित्व तिच्या आरोग्यावर अवलंबून आहे. गेल्या शतकात जमिनीची प्रत फार मोठ्या प्रमाणावर खराब झालेली आहे. जमीन सुधारण्यासाठी व कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी आपल्याला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. यावेळी ईशा फाउंडेशनचे श्री. सद्‌गुरु हे ऑनलाईन संदेशामध्ये म्हणाले की पृथ्वीवरील सशक्त जीवनासाठी आरोग्यवर्धक माती असणे गरजेचे आहे. माती सुरक्षीत राहण्यासाठी, तिच्या भरणपोषणासाठी प्रत्येकाने हृदय व मनापासून प्रयत्न करावेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते मृद विज्ञान संस्थेच्या माजी पदाधिकारी व विद्यापीठाच्या माजी शास्त्रज्ञांचा

सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. डी.आर. बिश्वास यांनी भारतीय मृदविज्ञान संस्थेच्या कार्याबाबत आढावा सादर केला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी केले. भारतीय मृद विज्ञान संस्थेच्या वतीने दिले जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा मृद विज्ञान संस्थेचे सचिव डॉ. के.के. बंडोपाध्याय यांनी केली. यामध्ये डॉ. असीमकुमार सरकार, डॉ. जगदिश प्रसाद, डॉ. ए.के. पात्रा, डॉ. के.के. बंडोपाध्याय, डॉ. प्रदिप डे, डॉ. एन.बी. प्रकाश, डॉ. बापुसाहेब भाकरे, डॉ रणजीतसिंग चौधरी, डॉ. धालीवाल, डॉ. पी. बालसुब्रमण्यम व डॉ. निर्मल यांना विविध पुरस्कार व फेलोशिपने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी ईशा फाउंडेशनला प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकाशनांचे व फुले स्मार्ट फर्टीलायझर कॅल्युलेटर या मोबाईल ॲपचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहसंयोजन सचिव डॉ. रितू ठाकरे यांनी तर सूत्रसंचालन आचार्य स्नातक सायली बिरादार हिने केले. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. या अधिवेशनासाठी देशभरातून ३५० पेक्षा जास्त मृदा शास्त्रज्ञ व १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास कृषि मंत्री ना. श्री. अब्दुल सत्तार यांची भेट



**दि. १ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला अत्याधुनिक करण्याबरोबरच देशातील सेंटर फॉर एक्सलन्य करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणुन राज्याचे कृषि मंत्री ना. श्री. अब्दुल सत्तार उपस्थित होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर, देशी गाय संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने उपस्थित होते. मंत्री श्री. अब्दुल सत्तार यांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केद्राला भेटी दरम्यान म्हणाले की देशातील आणि महाराष्ट्रातील विविध दुर्मिळ देशी गोवंशाच्या संवर्धनाचे काम महात्मा फुले कृषि विद्यापीठाद्वारे सुरु आहे. यासाठी लागणाऱ्या ८९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद मार्च महिन्यातील अर्थसंकल्पात केली जाईल. ब्राझीलसारख्या देशाने आपल्याच देशीवंशाच्या गायीवर संशोधन करुन सर्वाधिक दूध देणारी गाय विकसीत केली आहे. आता ब्राझील देशाचे अर्थकारण केवळ दुधावर चालते. मात्र आपले देशी गोवंशाकडे दुर्लक्ष झाले आहे असेही यावेळी ते म्हणाले.

## डॉ. संजीव माने व श्री. बाबासाहेब भोसले हे आहेत नोव्हेंबर महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून मफुकृवि आयडॉल्स हा उपक्रम गतवर्षी सुरु झालेला आहे. नोव्हेंबर महिन्यातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकरी आयडॉल म्हणुन कृषिरत्न डॉ. संजीव माने व कृषि उद्योजक म्हणुन श्री. बाबासाहेब भोसले यांची निवड झालेली आहे. डॉ. संजीव माने हे मु.पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली येथील शेतकरी असून कृषि पदविकाधारक श्री. बाबासाहेब भोसले हे मु. बिरेवाडी, पो. मांडवे बु., ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथील कृषि उद्योजक आहेत. शेतकरी आयडॉल डॉ. संजीव माने यांनी उसामध्ये पंचसुत्रीचा वापर केलेला आहे. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी उभी आडवी नांगरट, कुळवणी, कंपोस्ट खत १५ टन व जिवाणुंची ३ वेळा आळवणी केली आहे. ऊस लागवडीसाठी ५ फुट सरी, एक डोळा, बीजप्रक्रिया करुन सरीत आडवे दिड फुटांवर लागण करुन माती परिक्षणानुसार नत्र २८० किलो, स्फुरद १५० किलो, पालाश १५० किलो, सुक्ष्म अन्नद्रव्ये ३० किलो, गंधक ३० किलो, मॅग्नेशिअम सल्फेट ५० किलो, कॅल्शिअम ५० किलो प्रति एकर प्रमाणे रासायनिक व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करुन उसाच्या एकरी उत्पन्न वाढीचा उच्चांक केला आहे. त्यांनी महाराष्ट्रासह विविध राज्यात २४०० पेक्षा अधिक व्याख्यानांद्वारे तसेच व्हाट्सॲप ग्रुपद्वारे आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञानाचा प्रसार केला आहे. कृषि उद्योजक श्री. बाबासाहेब भोसले यांनी पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयातुन कृषि पदविकेचे शिक्षण घेतलेले आहे. श्री. बाबासाहेब भोसले यांनी सुरुवातीला कृषि सेवा केंद्राच्या माध्यमातून उद्योगाला सुरुवात करुन हायटेक नर्सरी, फर्टीलायझर कंपनी, फार्मर प्रोड्युसर कंपनी तसेच ग्रीनपर्ल इंडस्ट्रीज इ. उद्योगांची स्थापना करुन यशस्वी उद्योजक म्हणुन नावलौकीक मिळविला आहे व परिसरातील शेतकऱ्यांच्या विकासात भर घातली आहे. त्यांनी ठिबक सिंचन, अत्याधुनिक मशिनरी, सेंद्रिय शेती, माती पाणी परिक्षण या विषयावरील प्रत्यक्ष प्लॉट पाहणीसाठी शेतकऱ्यांना राज्याच्या विविध भागात स्वखर्चाने सहलींचे आयोजन केले आहे. त्यांनी स्थापन केलेल्या विविध उद्योगात ९० पेक्षा जास्त कायमस्वरुपी कर्मचारी व २५ ते ३० हंगामी कर्मचारी काम करीत आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रदर्शीत करण्यात येत आहे.

वर्ष :२, अंक क्रं. : २३, नोव्हेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## राज्यातील शेतकरी बांधवांसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केले नविन फुले बळीराजा डिजिटल कृषि सल्ला ॲप्लिकेशनचे पूर्वप्रक्षेपण



**दि. २४ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील शेतकरी बांधवांसाठी तत्पर सेवा मिळावी यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि जर्मनीच्या बी.एम.झेड., जी.आय.झेड. यांच्या सामंज्यस्य करारातून तसेच नाबार्ड, राष्ट्रीय कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था (मॅनेज), हैद्राबाद; कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त सहकार्याने पुणे येथे फुले बळीराजा या नावाने डिजिटल कृषि सल्ला ॲप्लिकेशनचा पूर्वप्रक्षेपण सोहळा संपन्न झाला. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना विद्यापीठाचे शास्त्रज्ञ यांचेकडून शेतीविषयी तात्काळ मार्गदर्शन होणार आहे. या पूर्वप्रक्षेपण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेचे (नाबार्ड) मुख्य कार्यकारी व्यवस्थापक डॉ. जी.एस. रावत होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पीक उत्पादनाबरोबरच काढणी पश्च्यात तंत्रज्ञानावर अधिक भर देऊन विपणन व्यवस्थापन साखळी विकसित करण्याची गरज व्यक्त केली. यात शेतकरी उत्पादक कंपनी यांना जास्त वाव असून त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक बाब समजून घेणे गरजेचे आहे. तसेच चांगले संघटन, चांगले उत्पादन, कमी भांडवलावर चांगला परतावा मिळण्यासाठी त्यांनी भर दयावा असे आवाहन केले.

फुले बळीराजा हे डिजिटल कृषि सल्ला ॲप्लिकेशन सर्व शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी जी.आय.झेड. व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्यात ३ डिसेंबर, २०२१ रोजी झालेल्या सामंजस्य करारासाठी विशेष श्रम घेतलेले संचालक संशोधन डॉ. सुनील गोरंटीवार यांनी हा प्रकल्प प्रथमदर्शनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यातील एका गावात व त्यानंतर सर्व गावांमध्ये सुरु होईल असे नमुद केले. फुले बळीराजा ह्या डिजिटल कृषि सल्ला ॲप्लिकेशनमध्ये अजूनही गरजेनुसार बदल केले जातील व यासाठी जी.आय.झेड.चे सहकार्य पुढेही मिळत राहील असे ते म्हणाले. पीक उत्पादनामध्ये जमीन हा एक महत्वपूर्ण घटक असून जमीनीचे आरोग्य चांगल्या प्रकारे ठेवण्यासाठी शास्त्रज्ञानी शेतकऱ्यास मार्गदर्शन करावे तसेच या ॲप्लिकेशनमुळे शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामधील दरी कमी होवून शेतकऱ्यांना निश्चितच मार्गदर्शन ठरेल असे प्रतिपादन विद्यापीठ अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे यांनी आपल्या स्वागतपर भाषणात हा प्रकल्प यशस्वीपणे राबवण्यासाठी शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत असलेले सर्व जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे, शेतकरी शात्रज्ञ मंच तसेच ग्रामीण कृषि कार्यानुभवाअंतर्गत असलेल्या कृषिदूत इत्यादींमार्फत हा प्रकल्प शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील असे नमूद केले. या प्रसंगी डॉ. भास्कर, सहसंचालक, मॅनेज, हैद्राबाद यांनी हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि विज्ञान केंद्राचे विशेषज्ञ यांना प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत आश्वाशीत केले. या

कार्यक्रमात श्रीमती भाग्यश्री पवार, कृषि अधिकारी, स्मार्ट प्रकल्प, पुणे यांनी जमीनीची धूप थांबविण्यासाठी शेतकऱ्यांनी करावयाच्या उपाययोजना विषद केल्या.

प्रो–सॉईल प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांनी फुले बळीराजा या डिजिटल कृषि सल्ला ऍप्लिकेशनच्या वापरासंबंधी सादरीकरण केले. यावेळी पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी, कास्ट–कासम प्रकल्पाअंतर्गत माती व्यवस्थापन संदर्भातील विविध अभ्यासक्रम, माती व्यवस्थापन सारग्रंथ, अल्प मुदत प्रशिक्षण अभ्यासक्रम इत्यादी पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व सहयोगी अधिष्ठाता, शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थेचे अधिकारी इत्यादी उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी सल्लागार व समन्वयक श्री. विश्वंभर राणे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी.आय.झेड.चे विभागीय व्यवस्थापक श्री. रणजीत जाधव व तांत्रिक तज्ञ श्री. हिमांशू वर्मा यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्री. जितेंद्र यादव यांनी मानले.

## भारतीय मृदविज्ञान संस्थेच्या ८६ व्या अधिवेशनाची सांगता




**दि. १७ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागातर्फे भारतीय मृदविज्ञान संस्थेचे ८६ वे वार्षिक अधिवेशन महात्मा फुले कृषि विद्यापीठात आयोजित करण्यात आले होते. भारतीय मृदा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी.आर. बिश्वास, संस्थेचे सचिव डॉ. के.के. बंडोपाध्याय, कोषाध्यक्ष डॉ. मीना व संयोजन समितीचे सचिव डॉ. बापूसाहेब भाकरे यांच्या उपस्थितीत समारोप कार्यक्रम पार पडला. चार दिवस चाललेल्या या अधिवेशनात जमीन, त्यांच्या समस्या, त्यावरील उपाय, कार्बन उत्सर्जन, सेंदिय, रासायनिक खते, नॅनो खते इत्यादी विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदरील अधिवेशनासाठी भारतातून ५०० हून अधिक मृदशास्त्रज्ञ उपस्थित होते. चार दिवस चाललेल्या या अधिवेशनात विविध शिफारशी करण्यात आल्या. शाश्वत शेती उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी माती परिक्षण करणे आणि त्या आधारे खतांचा वापर करणे, सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजीटल सॉईल सायन्सचा वापर अनिवार्य झाला आहे. शेतीद्वारे होणारे कार्बन उत्सर्जन, जमिनीची होणारी धूप कमी करण्याचा प्रयत्न, विविध उपाययोजना करण्याबाबत शिफारस करण्यात आली. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी, सेंद्रिय खते, पिकांचे अवशेष, हिरवळीची खते, जैविक खते, इत्यादींचा मोठया प्रमाणात वापर होणे आवश्यक आहे. खतनिर्मिती उद्योगाबाबत झालेल्या चर्चासत्रात, खतांची कार्यक्षमता वाढविण्याबाबत भर देण्यासंदर्भात शिफारस करण्यात आली.

समारोप प्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. सदरील अधिवेशन यशस्वी करण्यासाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे विशेष मार्गदर्शन मिळाल्याचे संयोजन समितीचे सचिव डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी समारोपप्रसंगी सांगितले.

संस्थेचे सचिव डॉ. बंडोपाध्याय यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बापूसाहेब भाकरे, सहसेक्रेटरी डॉ. रितू ठाकरे व कोषाध्यक्ष डॉ. श्रीगणेश शेळके व मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागातील सर्व शास्त्रज्ञांनी विशेष परिश्रम घेतले.

## पुणे कृषि महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुलेंना अभिवादन



**दि. २८ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा ज्योतिबा फुले यांची १३१ वी पुण्यतिथी पुणे कृषि महाविद्यालयात आयोजीत करण्यात आली. या प्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या जीवनामध्ये गरीब, शोषित, वंचित तसेच महिला व शेतकरी यांच्या उद्धारासाठी त्या काळी कोणी कल्पनाही करू शकणार नाही अशी अनेक क्रांतीकारक पावले समाज विरोधास न जुमानता उचलली होती असे सांगितले. महात्मा फुले यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग असे म्हणण्याऐवेजी मार्टिन ल्युथर किंग यांना अमेरिकेचे महात्मा फुले म्हणणे सयुंक्तिक राहील असे ते म्हणाले. महात्मा फुले यांच्या असंख्य पैलू असणारे व्यक्तीमत्व केवळ कृषिच्याच नव्हे तर सर्वच विद्यार्थी–शिक्षकांना आदर्श असल्याचे ते म्हणाले. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांनी सर्व विद्यार्थी–शिक्षक महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवत पुणे कृषि महाविद्यालयास फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील प्रथम क्रमांकाचे कृषि महाविद्यालय बनविण्यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही या प्रसंगी दिली. या प्रसंगी महाविद्यालयातील निवडक विद्यार्थी–विद्यार्थीनींनी आपले मनोगतांमधून या महापुरुषाबद्दल ऋण व्यक्त केले. महात्मा फुले पुण्यतीथीनिमित्त श्री. शिवराम जांभूळकर, अध्यक्ष, महात्मा फुले मंडळ, पुणे, श्री. पंढरीनाथ बनकर, अध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, पुणे, सौ. शारदा लडकत, अध्यक्ष, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळ, पुणे व श्री. प्रकाश डोके, अध्यक्ष, खडकमाळ आळी युवा मंच, पुणे यांनी महाविद्यालयातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून अभिवादन केले.

## पुणे येथील शेती उत्पादनावर आधारीत प्रदर्शनात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सहभाग

**दि. १ ते २ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतीक बँक अर्थसहाय्यीत भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाने पुणे येथे आयोजीत शेती उत्पादनावर आधारीत प्रदर्शनात सहभाग घेतला. या प्रदर्शनात हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाने तयार केलेले नाविन्यपूर्ण अविष्कार प्रदर्शित केले होते. या प्रात्यक्षिकांना शेतकऱ्यांचा प्रचंड



प्रतिसाद मिळाला. कृषि विद्यापीठाच्या प्रदर्शन स्टॉलला केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री ना. श्री. नरेंद्रसिंह तोमर, महाराष्ट्र राज्याचे कृषि मंत्री ना. श्री. अब्दुल सत्तार, फलोत्पादन मंत्री ना. श्री. संदिपान भुमरे, केंद्रिय कृषि आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव श्री. मनोज अहुजा, केंद्रिय फलोत्पादन आयुक्त डॉ. प्रभात कुमार यांच्यासह विविध मान्यवरांनी भेट दिली. यावेळी संशोधन संचालक व कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी मान्यवरांना प्रकल्पाने तयार केलेल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यापीठाच्या या स्टॉलमध्ये ड्रोन, ऑटो पी.आय.एस., स्मार्ट पी.आय.एस., स्वयंचलीत पंप प्रणाली आणि सेंसरआधारित सिंचन प्रणाली या तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, कृषि यंत्रे व शक्ति विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, जलसिंचन व निचरा विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम, डॉ गिरीष भणगे, डॉ. प्रज्ञा जाधव आणि इंजि. विशाल पांडेय यांनी मान्यवरांना व उपस्थित शेतकऱ्यांना या तत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. सदर प्रदर्शनास सहभागी होण्यासाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ आणि संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक व प्रदर्शनाचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले.

## मृदा विज्ञान वार्षिक कार्यशाळेत शेतकरी संवाद कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १६ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या मृदा विज्ञान सोसायटीच्या ८६ व्या वार्षिक अधिवेशनादरम्यान नाबार्ड यांच्या सहकार्याने शेतकरी संवाद कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ होते. कार्यक्रमासाठी विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, मृदा विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठातील शास्त्रज्ञ व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्प अंतर्गत सहभागी

वर्ष :२, अंक क्रं. : २३, नोव्हेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

गावे चिंचविहिरे, कणगर, तांभेरे व कानडगाव येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी प्रगतशिल शेतकरी श्री. रावसाहेब गाडे यांनी अतिवृष्टीमध्ये सोयाबीन–फुले संगमचे एकरी १५ क्विंटल विक्रमी उत्पादन घेतल्यामुळे त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या शकांचे निरसन केले. जमिनीमधील सूक्ष्मजीवांचे महत्त्व व त्यांच्याद्वारे केले जाणाऱ्या कार्याबद्दल डॉ. तानाजी नरुटे यांनी मार्गदर्शन केले. जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन या विषयावर डॉ. अनिल दुरगुडे यांनी मार्गदर्शन केले. ऊसातील पाचट व्यवस्थापन या विषयावर डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी मार्गदर्शन केले. गांडूळ खत निर्मितीबाबत डॉ. महेंद्र मोटे यांनी मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेती या विषयावर डॉ. उल्हास सुर्वे यांनी तर पाण्याच्या अतिवापरामुळे व निचऱ्याची व्यवस्था नसल्यामुळे ज्या जमिनी क्षारयुक्त होत आहे त्यांचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले पाहिजे याबद्दल डॉ. रावसाहेब पवार यांनी मार्गदर्शन केले. मृदा व जलसंधारण या विषयावर डॉ. विजय अमृतसागर आणि विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचा कशाप्रकारे सामाजिक व आर्थिक विकास झाला याबद्दल डॉ. पंडित खर्डे यांनी मार्गदर्शन केले. कनेक्टिंग फार्मर ग्रुपचे राकेश शर्मा यांनी उसापासून तयार होणारे विविध पदार्थ व त्याचे विक्री व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संकलक म्हणुन डॉ. आनंद जाधव यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभय पाटील व आभार प्रदर्शन डॉ. सचिन सदाफळ यांनी केले. या कार्यक्रमाला कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार, कृषि विद्या विभागाचे प्रमुख डॉ. आनंद सोळंके व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा ज्योतिबा फुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**दि. २८ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी व समाजातील अविकसित घटकांसाठी, समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा यांच्या विरुद्ध अखंडितपणे काम करून स्वतःचे आयुष्य समाजासाठी झोकुन दिले. त्यांचे विचार आजही आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक आहेत असे प्रतिपादन विस्तार शिक्षण संचालक डॉ तानाजी नरुटे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव व राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. नरुटे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, पदव्युतर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे,

हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. गोरक्ष ससाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे आणि क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. पवार, डॉ. चव्हाण यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी आपले विचार व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनचरित्रावर भाषणे करण्याची संधी देण्यात आली. याप्रसंगी कु. साक्षी निकम, अंगद लाटे, प्रशांत शिंदे व कु. अंकिता नेवसे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुराज जोडवे याने तर आभार प्रदर्शन निलेश मावळे यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा



**दि. २६ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पदव्युतर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.गोरक्ष ससाणे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, कुलगुरूंचे विशेष कार्य अधिकारी डॉ. महानंद माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान,कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, उद्यानविद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. ढाकरे, उपकुलसचिव श्री. विजय पाटील,क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयापासून मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत भारतीय राज्यघटनेच्या प्रतिमेची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या संविधान रॅलीमध्ये पदव्युतर महाविद्यालय, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि हळगाव कृषि महाविद्यालयाचे सुमारे ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये संविधान दिनाच्या घोषवाक्यातून संविधानाचे महत्त्व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत कसे पोहोचेल याचा संदेश देण्यात आला. यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर झालेल्या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. चव्हाण यांनी उपस्थितांना संविधानाच्या उद्देशिकेची सामूहिक शपथ दिली. डॉ. चौहान यांनी संविधानाबद्दलची पार्श्वभूमी यावेळी विषद केली.याप्रसंगी २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या भारताच्या थोर सुपुत्रांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी पदव्युतर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सुजाता कांबळे हिने संविधानाबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी डॉ. प्रेरणा भोसले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रा. कीर्ती भांगरे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी, विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिनंदन

### डॉ. बापुसाहेब भाकरे यांना मृदविज्ञान संस्थेची फेलोशिप प्रदान




**दि. १५ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागातर्फे भारतीय विज्ञान संस्थेचे ८६ वे वार्षिक अधिवेशन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पार पडले. मृदशास्त्रातील भरीव कार्याबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या मृदशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे यांना मृदविज्ञान संस्थेची फेलोशिप भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे उपसंचालक डॉ. सुरेशकुमार चौधरी व महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, भारतीय मृदाविज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. आर. बिश्वास, सचिव डॉ. के.के. बंडोपाध्याय उपस्थित होते. डॉ. भाकरे हे गेल्या ३८ वर्षापासून कृषि विद्यापीठाच्या संशोधन, शिक्षण व विस्तार या क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी त्यांनी ४२ विविध शिफारशी दिल्या असून त्याचा राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक फायदा झाला आहे. त्यांनी आजतागायत १४० हुन अधिक संशोधन लेख, २१ पुस्तके, विविध वृत्तपत्रे व मासिके यातून शेतकऱ्यांसाठी कृषि विस्ताराचे कार्य केले आहे. याशिवाय शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षणे, शेतकरी मेळावे यांचे आयोजन केले आहे. त्यांना आत्तापर्यंत वसंतराव नाईक कृषि प्रेरणा पुरस्कार, मृदगंध पुरस्कार, कृषिथॉन पुरस्कार, ॲग्रोकेअर आयडॉल पुरस्कार, उत्कृष्ट संशोधन लेख इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे व कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### लखनऊ येथील शास्त्रज्ञांची पाडेगाव ऊस संशोधन केंद्रास भेट

**दि. १६ नोव्हेंबर, २०२२.** अखिल भारतीय समन्वित ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे कार्यरत आहे. भारतीय ऊस संशोधन संस्था, लखनऊ यांचे मार्फत दरवर्षी शास्त्रज्ञांची टिम ऊसावरील प्रयोग पाहण्यासाठी पाठविली जाते. यावेळी या समितीचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, ऊस पैदासकार, धारवाड, यांचेबरोबर या समितीचे सदस्य डॉ. अरूण बैथा, किटकशास्त्रज्ञ, लखनऊ, डॉ. संजयकुमार यादव, कृषि विद्यावेत्ता, लखनऊ आणि डॉ. भारत पवार, रोगशास्त्रज्ञ, पुणे यांनी संशोधन केंद्रास भेट दिली. या प्रसंगी संशोधन केंद्राचे प्रमुख आणि ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांचे अध्यक्षतेखाली बैठक आणि शिवारफेरी पार पडली. सर्वप्रथम या शास्त्रज्ञांचे पाडेगाव संशोधन केंद्राच्या वतीने ऊस विशेषज्ञ यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत



केले. त्यानंतर मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राच्या गेल्या पाच वर्षाच्या संशोधनाचा आढावा डॉ. रासकर यांनी सादर केला. बैठकीनंतर सर्व शास्त्रज्ञांनी ऊस पैदास विभागातील सर्व नवीन आशादायक ५७ वाणांची पाहणी केली. या ठिकाणी ऊसपैदास शास्त्रज्ञ डॉ. माधवी शेळके यांनी सर्व प्रयोगांची आणि वाणांची सखोल माहिती दिली. किटकशास्त्र विभागात डॉ. शालीग्राम गांगुर्डे यांनी किड नियंत्रणाचे विशेषतः कांडीकीड, हुमणी, लोकरीमावा यांच्या बंदोबस्तातील प्रयोगांची माहिती दिली. या समितीने समाधान व्यक्त केले. या भेटीच्या वेळेला पाडेगाव ऊस संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, डॉ. दिपक डामसे, डॉ. सुरेश उबाळे आणि श्री. माधव भुसे हे सहभागी झाले.

## पुणे कृषि महाविद्यालयात ग्रँट मेडिकल फाउंडेशनच्या मदतीने मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन



**दि. २३ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुणे कृषि महाविद्यालयात विद्यार्थी व शिक्षकांसाठी पुण्यातील रुबी हॉल क्लिनीक या रुग्नालयाचे व्यवस्थापन करणाऱ्या ग्रँट मेडिकल फाउंडेशनच्या वतीने मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर होते. यामध्ये डॉ. परवेझ ग्रँट यांनी हृदयरोग, उच्च रक्त दाब, हृदय विकाराचा झटका हे सर्व टाळण्यासाठीचा आहार विहार या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. विशाल भस्मे यांनी मज्जा संस्थेचे आजार व उपचार याबाबत माहिती दिली. डॉ. प्रमोद कदम यांनी रोबोटीक तंत्रज्ञानाद्वारे शस्त्रक्रिया कशासाठी व कशा प्रकारे केल्या जातात तसेच त्यांचे रुग्नांना कोणते लाभ होतात याबद्दल उपस्थितांना अवगत केले. डॉ. स्नेहा तिरपुडे यांनी सर्व सामान्यांनी स्वतःच्या फुफ्फुसांची कशा प्रकारे काळजी घ्यावी व वेगवेगळ्या प्रकारच्या ॲलर्जीपासून कसे वाचावे याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. प्रसाद सुर्यवंशी यांनी आरोग्यविषयक इमर्जन्सी परिस्थितीमध्ये कोणकोणते उपाय करावे याची माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्रादरम्यान उपस्थितांच्या शंकाचे समाधान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत हरभरा बिजोत्पादन तंत्रज्ञान विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. ३ नोव्हेंबर,२०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कार्यरत असलेल्या नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत आणि कृषि विभागाच्या सहकार्याने आयोजीत हरभरा बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम राहुरी तालुक्यातील तांभेरे या ठिकाणी आयोजित केला गेला. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे, हरभरा रोग शास्त्रज्ञ डॉ. सुदर्शन लटके, सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. व्ही. एम. कुलकर्णी, मेजर ताराचंद गागरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रकल्प समन्वयक डॉ.पंडित खर्डे यांनी सर्वांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकात शेतकरी प्रथम प्रकल्पाची उद्दिष्टे व उपलब्धी विषद केली. हरभरा बिजोत्पादन तंत्रज्ञानाबाबत माहिती देताना डॉ. नंदकुमार कुटे यांनी हरभरा बिजोत्पादनासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी डॉ. कुटे यांनी सांगितले की शेतकऱ्यांनी विद्यापीठाने विकसित केलेल्या फुले विक्रम, फुले विक्रांत या वाणांचा वापर करावा. डॉ. लटके यांनी हरभरा पिकावरील रोग व कीड व्यवस्थापन, कीटकनाशकांचा योग्य वापर याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. कुलकर्णी यांनी भारत सरकारच्या सीड हब या प्रकल्पाबाबत माहिती दिली. यावेळी त्यांनी बिजोत्पादनाच्या महत्वाच्या तीन टप्प्यांची माहिती दिली. यावेळी चिंचविहिरे व कनगर गावच्या शेतकऱ्यांनी शेतकरी प्रथम प्रकल्पाबद्दलचे आपले अनुभव सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले. प्रकल्प सहाय्यक श्री. किरण मगर यांनी आभार मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कानडगाव, तांभेरे, चिंचविहिरे व कनगर या गावातील शेतकरी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रकल्प सहाय्यक श्री. राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या निवृत्ती वेतनधारकांना दिलासा

**दि. ४ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या निवृत्त वेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना सुचित करण्यात येत आहे की माहे १ नोव्हेंबर रोजी हयात असल्याचा दाखला सुलभरीत्या सादर करणे कामी चालू वर्षी हयात प्रमाणपत्र नोंदविणे कामे बँकेस निवृत्तीवेतनधारकांची यादी उपलब्ध करून देण्यात येत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठातून सुमारे ५००० निवृत्तीवेतनधारक विविध जिल्ह्यातून निवृत्तीवेतनाचा लाभ घेत असून त्यांना एक नोव्हेंबर रोजी हयात असलेबाबतचा दाखला देणे करिता विद्यापीठाचा विविध नमुन्यातील फॉर्म भरून तो विद्यापीठाचे विद्यमान अधिकारी अथवा बँकेचे शाखा अधिकारी यांचे साक्षांकन घेऊन सहायक नियंत्रक-(१), मफुकृवि.,राहुरी यांना सादर करावा लागत असे. निवृत्ती वेतनधारकांचा कार्यालयास प्रत्यक्ष भेटीचा त्रास कमी करण्याचे उद्देशाने चालू वर्षी

सेवानिवृत्ती वेतनधारक अथवा कुटुंब निवृत्तीवेतनधारक पुणे, धुळे, कोल्हापूर आणि राहुरी यांना हयातीचा दाखला जमा करण्याकरिता कृषि विद्यापीठ, राहुरी येथे प्रत्यक्ष येणे आवश्यक नसून निवृत्तीवेतनधारक ज्या बँकेत निवृत्तीवेतन घेत आहेत त्या बँकेत जाऊन आपले ओळखपत्र उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक इत्यादी दर्शवून विद्यापीठाने पाठविलेल्या बँक यादीतील आपल्या नांवासमोर स्वाक्षरी करावी किंवा अंगठा द्यावा. ज्या निवृत्ती वेतनधारकांना प्रत्यक्ष बँकेत जाणे शक्य नसेल अशा निवृत्तीवेतनधारकांनी विविध नमुन्यातील साक्षांकन केलेला हयातीचा दाखला पाठविल्यास तो स्वीकारला जाईल. तरी निवृत्ती वेतनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी  केले आहे.

## बुचकेवाडी येथे काटेकोर सिंचन व्यवस्थापन या विषयावरील प्रशिक्षण संपन्न



**दि. २८ नोव्हेंबर,२०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी येथील हवामान अध्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, राष्ट्रीय कृषि विकास योजना, सिंचन पाणी गरज सल्ला सेवा आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाद्वारे पुरस्कृत विद्यापीठ प्रणालीद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञान अनुप्रयोग यासाठी सहाय्य प्रकल्पांतर्गत बुचकेवाडी ता. जुन्नर, जि. पुणे येथे काटेकोर सिंचन व्यवस्थापन या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण, प्रात्यक्षिक तसेच प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये इंजि. निखिल दुगड यांनी पिकांच्या पाण्याची गरज काढण्यासाठी फुले ॲपचा वापर याविषयी सविस्तर माहिती देऊन या फुले ॲपचे प्रात्यक्षिक दाखविले. इंजि. तेजश्री नवले यांनी काटेकोर पाणी व्यवस्थापन याकरिता आयओटी तंत्रज्ञानाचा वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. शुभांगी घाडगे यांनी हवामान अद्ययावत कृषि डिजिटल गाव संकल्पना याविषयी मार्गदर्शन करून कास्ट प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या विविध तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. या प्रशिक्षणानंतर ऑटोपीआयएस या स्वयंचलित सिंचन प्रणालीचे प्रात्यक्षिक आणि प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी बुचकेवाडी येथील सरपंच श्री. सुहास डेरे, उपसरपंच श्री. सुरेश गायकवाड यांच्यासह शेतकरी व तरुण सहभागी झाले होते. यावेळी या प्रशिक्षणाबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून कृषि क्षेत्रातील या डिजिटल तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता दाखविली. विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक तथा कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरंटीवार, कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे आणि जलसिंचन व निचरा अभियांत्रिकीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनील कदम यांच्या सहकार्याने या प्रशिक्षण तसेच प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर इंजि. अभिषेक दातीर यांनी आभार प्रदर्शन केले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक संपन्न



**दि. २३ नोव्हेंबर, २०२२.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक मंचाचे सदस्य प्रयोगशील शेतकरी श्री. महेंद्र परदेसी, कुसुंबा धुळे यांचे प्रक्षेत्रावर कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे संपन्न झाली. सदर बैठक शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती मिळावी तसेच प्रमुख रबी पिकांचे नियोजन, पपई फळपिकाचे नियोजन, शेतकरी स्वानुभव आणि शास्त्रज्ञांनी एकत्र चर्चा करून शेतिविषयक प्रश्न सोडवण्याच्या उद्देशाने संपन्न झाली. शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे उपाध्यक्ष श्री. हितेंद्र गिरासे, केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री. रोहित कडू, डॉ. धनराज चौधरी, श्री. महेंद्र परदेसी, श्री. प्रतापसिंग गिरासे, श्री. लालित देवरे, श्री. विनोद पाटील, श्री. गोरख पाटील, श्री. शिवाजी देशमुख आदी मंचाचे सदस्य बैठकी दरम्यान उपस्थित होते. सदर बैठकीचे संचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. रोहित कडू यांनी केले.

## कृषि संशोधन केंद्र, लोणावळामार्फत कुरवंडे येथे महिला शेतकरी शेतीशाळा संपन्न



**दि. १५ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि संशोधन केंद्र, लोणावळा व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कुरवंडे येथे महिला शेतकरी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुरवंडेच्या सरपंच सौ. अनिता कडु यांच्या अध्यक्षतेखाली ही शेतीशाळा घेण्यात आली. यावेळी रब्बी हंगामातील हरभरा या पिकावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी लोणावळा येथील कृषि संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. किरण रघुवंशी यांनी हरभरा पिकात रासायनिक व जैविक बिजप्रक्रिया, किड व रोग आणि सेंद्रिय पदार्थांचे महत्व पटवुन दिले. कुरवंडे येथील कृषि सहाय्यक मनीषा दगडखैर यांनी कृषि विभागाच्या योजनांबाबत माहिती दिली. या प्रसंगी माजी पोलीस पाटील ताराबाई कडु, संजीवनी कडु व कुरवंडे गावातील महिला शेतकरी उपस्थित होत्या. ग्रामसेवक उज्वला डावरे यांनी आभार व्यक्त केले.

## नंदुरबार जिल्ह्यातील वालंबा येथे लोकसहभागातून वनराई बंधारा






**दि. १७ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, नंदुरबार व अक्कलकुवा तालुक्यातील वालंबा येथील कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वालंबा येथे वनराई बंधारा व कृषि माहिती पर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाबरोबरच उमरपाडा येथे शेतकऱ्यांना रब्बी बीज प्रक्रिया, रब्बी पीक तंत्रज्ञानासह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी नंदुरबार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु.बी. होले यांनी बिजप्रक्रियेचे महत्व तसेच बुरशीजन्य रोगांपासून पिकांचे संरक्षण होण्यासंबंधीची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना सांगितली. डॉ. पी.पी. गिरासे यांनी हरभरा, गहू, रब्बी ज्वारी तंत्रज्ञान यावर माहिती दिली. प्रा. एस.जी. राजपूत यांनी भाजीपाला व फळपिक उत्पादन तसेच शेडनेट यावर माहिती दिली. शेतीचे अर्थशास्त्र डॉ. एस.डी. पाटोळे यांनी समजावून सांगितले. या कार्यक्रमानंतर गावकऱ्यांच्या लोकसहभागाने पाटीलवाडा येथे वनराई बंधारा बांधण्यात आला. कृषि सहाय्यक सचिन राजपूत यांनी प्रास्ताविक केले तर रुपसिंग वसावे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीचे सदस्य राजेसिंग वसावे, शिवाजी वसावे व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज येथे पालक–शिक्षक सभा संपन्न



**दि. १८ नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता. मिरज जि. सांगली येथील प्रथम वर्ष वर्गाची पालक–शिक्षक सभा उत्साहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्र

विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी होते. यावेळी डॉ. मनोज माळी यांनी दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध कराव्या लागतील हे सांगितले. विद्यालय राबवित असलेल्या रोपवाटीका, बिजोत्पादन, गांडूळखत, दुग्धव्यवसाय या प्रकल्पांची माहिती यावेळी संबंधीत विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात आली. पालक सभेच्या ठिकाणी सुदर्शन डोळ्याचे हॉस्पीटल सांगली यांच्यावतीने नेत्र तपासणी आणि आरोग्य तपासणी शिबीराचे अयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी ४० पालक उपस्थित होते. कनिष्ठ लिपीक नितीन घोरपडे यांनी आभार मानले.

## अंजीर व सिताफळ संशोधन केंद्रातर्फे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**दि. ३० नोव्हेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, कृषि विज्ञान केंद्र, बारामती आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने सिताफळ उत्पादन तंत्रज्ञान व उत्तम कृषि पद्धती या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथील शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ उत्पादन तंत्रज्ञान तर सिताफळातील एकात्मिक रोग–कीड व्यवस्थापन याविषयावर डॉ. युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच कृषि विज्ञान केंद्र, बारामतीचे शास्त्रज्ञ डॉ. मिलिंद जोशी व महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) चे श्री. कुदळे यांनी मॅग्नेट प्रकल्प व गॅप प्रमाणपत्र याविषयावर मार्गदर्शन केले. श्री. वैभव तांबे, उपविभागीय कृषि अधिकारी, बारामती यांनी कृषि विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. श्री. सुरज जाधव, तालुका कृषी अधिकारी पुरंदर यांनी सिताफळ लागवड व प्रकिया उधोग यावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम पुरंदर तालुका सिताफळ संघाचे अध्यक्ष श्री.निलेश काळे, पदाधिकारी श्री माउली मेमाणे, श्री शांताराम पोमण व श्री. बाळासाहेब मुळीक, महाराष्ट्र राज्य अंजीर उत्पादक संघाचे उपाध्यक्ष श्री.रामचंद्र खेडेकर, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष व प्रगतीशील शेतकरी श्री. देवराम काळे, श्री. प्रदीप काळे, श्री. भाऊसो झेंडे व श्री. अमित काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदर कार्यक्रमास ढूमेवाडी आणि दिवे पंचक्रोशीतील सिताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सागर काळे, जलदूत, पुरंदर यांनी केले.

वर्ष :२, अंक क्रं. : २३, नोव्हेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## डिसेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग लागवडीसाठी मध्यम खोल, उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी. खरीप हंगामातील पीक निघाल्यानंतर जमिनीची खोल नांगरट करावी. त्यानंतर तीन ते चार कुळवण्या करून ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अगर कंपोष्ट खत जमिनीत मिसळावे.

- **ऊस**
- आडसाली उसाची मोठी बांधणीची कामे पूणे करावीत. बांधणीचे वेळी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ८५ किलो पालाश ( १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. को.८६०३२ जातीसाठी प्रति हेक्टरी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फास्फेट) व १०० किलो पालाश (१६६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावा.
- पूर्व हंगामी उसासाठी पीक १२ ते १६ आठवडयाचे असताना ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) ६:१ याप्रमाणे निंबोळी पेंडीबरोबर मिसळून द्यावे.
- सुरु ऊस लागणीसाठी पूर्व मशागतीची कामे पूर्ण करून दोन डोळा टिपरीने उसाची लागण १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी या कालावधीत करावी.
- उसाची लागण सलग पध्दतीने करताना दोन सऱ्यांमधील अंतर मध्यम जमिनीत १ मीटर व भारी जमिनीत १.२० मीटर ठेवावे. तसेच जोड ओळ पध्दतीने लागण करावयाची असल्यास मध्यम जमिनीत २.५-५ फूट व भारी जमिनीत ३-६ फूट अंतर ठेवावे.
- लागणीसाठी को.८६०३२, फुले १०००१, कोएम ०२६५, को.९४०१२, कोसी ६७१, को.व्ही. एस.आय. ९८०५, व्ही.एस.आय.४३४ आणि को. ९२००५ यापैकी एका वाणाची निवड करावी. लागवडीसाठी एक अथवा दोन डोळयांच्या टिपऱ्या अथवा प्लास्टीक ट्रे मधील एक डोळा रोपे वापरावीत.
- लागणीपूर्वी बेणे ३०० मि.ली. मॅलॅथिऑन किंवा डायमेथोएट ३०% २६५ मिली. आणि १०० ग्रॅ. बाविस्टीन १०० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रत्येकी प्रती हेक्टरी १० किलो व १.२५० कि.ग्रॅ.१०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी.
- सुरु उसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५४ किलो युरिया), ६० किलो स्फुरद (३७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. तसेच सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास रासायनिक खते देण्याचे वेळेस प्रती हेक्टरी फेरस सल्फेट-२५ किलो, झिंक सल्फेट-२० किलो, मॅगनिज सल्फेट-१० किलो आणि बोरॅक्स-५ किलो शेणखतात मिसळून १०:१ प्रमाणात द्यावे व खते रांगोळी पध्दतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर द्यावीत. को.८६०३२ या जातीसाठी रासायनिक खतांची २५%जास्त मात्रा द्यावी.
- बेणे मळयातील निरोगी बेणेच ऊस लागणीसाठी वापरावे. खोडव्याचा ऊस लागणीसाठी वापरु नये.
- ऊस लागणीनंतर ४-५ दिवसांनी वापसा आल्यावर ५ किलो अॅट्राझिन (अॅट्राटाप) किंवा मेट्रीब्युझीन (सेंकॉर) १४५० ग्रॅ प्रति हेक्टरी १००० लिटर पाण्यात विरघळून संपूर्ण जमिनीवर हात पंपाने सकाळी/सायंकाळी फवारावे. फवारणी करताना फवारलेली जमीन तुडवू नये.
- ठिबक सिंचन संचातुन पाणी देताना त्या त्या विभागातील हवामान विचारात घेऊन दररोजची पाण्याची गरज काढण्यासाठी ''फुले जल'' संगणक प्रणालीचा वापर करावा. ऊस पिकासाठी ७५-१०० सेंमी. (२.५ ते ५ फुट)

वर्ष :२, अंक क्रं. : २३, नोव्हेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

जोडओळ (मध्यम जमिनीसाठी), ९०–१८० सेंमी. (३ ते ६ फुट) जोडओळ (भारी जमिनीसाठी) व ५ फुटी लागवड पध्दतीचा वापर करावा.

- ठिबक सिंचन संचातून उसासाठी पाण्याबरोबर विद्राव्य खतांच्या शिफारशीत मात्रेचा वापर करावा.
- उसावरील लोकरी माव्याच्या नियंत्रणासाठी कोनोबाथ्रा, मायक्रोमस, डिफा ॲफिडिव्हरा हे मित्र किटक माव्यासोबत असतील तर शक्यतो किटकनाशक वापरु नये. मित्र किटकांची उपलब्धता नसल्यास फोरेट १० % दाणेदार एकरी ६ ते ८ किलो या प्रमाणात ९ महिन्यापर्यंतच्या उसासाठी वापरावे किंवा डायमिथोएट ३०% प्रवाही किंवा मिथील डिमॅटॉन २५% प्रवाही १५ मिली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आवश्यकतेनुसार आलटून–पालटून फवारणी करावी.

- **हरभरा व्यवस्थापन**
- पिकास गरजेनुसार पाणी द्यावे.
- पीक फुलोऱ्यात असताना आणि घाटे भरण्याच्या अवस्थेत २ टक्के युरीयाची फवारणी करावी.
- घाटेआळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल (५०० मिली/५०० लि. पाणी) या जैविक किटकनाशकाची दुसरी फवारणी करावी व आवश्यकता असेल तर तिसरी फवारणी १८.५ % एस सी क्लोरअन्ट्रीनिलोप्रोल (१०० मिली/५०० लि. पाणी) या किटकनाशकाची करावी.

- **तूर**
- विविध वाणांच्या पक्वता कालावधीनुसार काढणी व मळणी करावी.

- **नाचणी**
- स्वच्छता आणि वाळवणे : वारे देणे, उन्हात वाळविणे.
- पॅकेजिंग/वेष्टणे : ५० किलो प्लास्टीक पिशवीमध्ये
- साठवणुक : लोखंडी कोठीमध्ये बियाण्यामध्ये ओलाव्याचे प्रमाण १० ते १२% असावे.

- **रब्बी ज्वारी**
- डिसेंबर महिन्यात १५ अंश से. च्या खाली तापमान गेल्यास मावा किडीचे प्रमाण वाढते. त्यामुळे चिकटा रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथॉईट ५०० मी. ली. ५०० लिटर पाण्यातून फवारावे. पाण्याच्या

**गहू**

- बागायती गव्हाची उशिरा पेरणी १५ डिसेंबरपर्यंत करावी.
- बागायती उशीरा पेरणीसाठी फुले समाधान, एनआयएडब्लु ३४, एचडी २९३२, एचडी ३०९० व एकेएडब्लु ४६२७ या सुधारीत वाणांचा उपयोग करावा.
- बागायत गव्हाची उशीरा पेरणी दोन ओळीत १८ से.मी. अंतर ठेवून करावी. उशिरा पेरणीसाठी दर हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे.
- गव्हाच्या उशिरा केलेल्या पेरणीसाठी हेक्टरी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश पेरणीच्यावेळी व पेरणीनंतर २१ दिवसांनी हेक्टरी ४० किलो नत्राचा दुसरा हफ्ता द्यावा.

- गहू पिकातील अरुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी प्रती हेक्टरी आयसोप्रोटयूरॉन (५० टक्के) दोन ते तीन किलो ६०० ते ८०० लिटर पाण्यातून फवारावे. तसेच रुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी प्रती हेक्टरी मेटसल्फ्यूरॉन मिथाईल (२० टक्के) प्रती हेक्टरी २० ग्रॅम ६०० ते ८०० लिटर पाण्यातून फवारावे.
- गहू पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास (१० मावा किडीची पिल्ले किंवा प्रौढ प्रती झाड प्रति फांदी) त्यांच्या नियंत्रणासाठी जैविक घटकांमध्ये मेटाऱ्हाझिअम ॲनिसोपली १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम किंवा व्हर्टिसिलीअम लेकॅनी १.१५ डबल्यू पी, ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी घेवून १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

- **फळबाग व्यवस्थापन**
- डाळिंब – बाग ताणावर सोडावी. सुत्रकृमी नियंत्रणासाठी शेणखतासोबत ट्रायकोडर्माचा २५ किलो प्रति हेक्टरी वापर करावा.
- सिताफळ – फळे काढून झाल्यानंतर हलकी छाटणी करावी झाडावरील काळी पडलेली फळे काढू न टाकावीत.
- बोर – फळांची काढणी करावी.
- आवळा – बाग ताणावर सोडावी.
- अंजीर – पाणी नियंत्रण व तांबेरा व भुरी नियंत्रण करावे.
- कागदी लिंबू – मृग बहाराच्या फळांची काढणी करावी.
- मोसंबी कागदी लिंबू – मावा, सिल्ला आणि पाने पोखरणारी अळी : थायोमिथोक्झाम(२५ ग्रॅम) १० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

- **भाजीपाला व्यवस्थापन**
- खरीप हंगामातील लागवड केलेल्या वांगी, मिरची, टोमॅटो, वेलवर्गीय भाजीपाला पिकाची तोडणी करावी.
- रबी हंगामातील कांदा पिकाची लागवड करावी.
- कांदा लागवड सपाट वाफ्यात करावी.
- कांदा पिकास नत्र खताची मात्रा द्यावी.
- रबी टोमॅटो लागवडीस नत्र खताची मात्रा द्यावी.
- वाटाणा व इतर रबी पिकास नत्र खताची मात्रा द्यावी.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय वेळीच करावे.

- **आले**
- काढणी : खोडवा ठेवण्याचा निर्णय झाल्यास पडलेल्या बांड्यांचे बेडवर अच्छादन म्हणून सर्व क्षेत्रफळावर व्यवस्थित पसरवून घ्याव्यात व त्या वाऱ्याने उडून जाऊ नयेत म्हणून मधील मातीची हलकी भर द्यावी. माल कुठेही उघडा दिसणार नाही याची काळजी घ्यावी व पाण्याच्या पाळ्या योग्य ओल टिकून राहील याप्रमाणे द्याव्यात.
- कालावधी सर्वसाधारण पूर्ण होण्यास जानेवारी महिना येतो.
- जानेवारीमध्ये माल बियाणेसाठी काढावयाचा की जुना (खोडवा) ठेवायचा याचा निर्णय घ्यावा जर जुना (खोडवा) ठेवायचा निर्णय घेतल्यास या मालाला उन्हाळ्यात वरुन अच्छादनाची गरज असते त्यासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बेडवर बियाण्याची अथवा रोपाणी लागण करावी.

- यासाठी वेलवर्गीयामध्ये काकडी, डांगर, खरबुज, टरबूज, चवळी, अथवा रोपाची लागण करावी व रोपामध्ये झेंडू सारख्या ३ महिन्यात निघणाऱ्या पिकाची लागवड करावी.
- वरीलपैकी कोणतेही ३ महिन्याचे आंतरपिकाचे उत्पादन घ्यावे व एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात हा जुने पीक उगवण्यास सुरूवात होईल. ती वेळ साधुन वरुन टोकलेल्या पिकाचे हलके उत्पादन घेऊन त्याची धसकडे काढून घ्यावीत व खोडव्या पिकाला वाढण्यास वाव द्यावा. जमिनीत उरलेल्या मात्रेवर हा माल पोसू शकतो व शेताची स्वच्छता चांगली राखल्यास (तणांचा बंदोबस्त) उत्पादनात चांगली भर पडू शकते.

## पशुसंवर्धन

- जनावरांच्या आहारात पशुखाद्यामध्ये अधिक उर्जा निर्माण करणऱ्या पदार्थाचा उदा. ज्वारी, गहू, मका यांचा भरडा इ. वापर करावा.
- दूध काढते वेळी कास धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा. शक्य असल्यास जनावर धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा.
- थंडीमुळे जनावरांच्या आरोग्यास अपाय नसला तरी व्यवस्थापनाच्या दृष्टीने जनावरे रात्री व पहाटे गोठयात ठेवावीत.

## अवजारे

**विद्युत मोटारचलीत फुले ऊस बेणे तोडणी यंत्र**

- एका अश्वशक्ती व सिंगल फेज विद्युत मोटरचलीत यंत्र
- रोपवाटीकेसाठी ४० ते ७० सें.मी.लांबीचे ऊस बेणे तयार करण्यासाठी उपयुक्त
- एका तासात ६५ ऊस बेणे तयार करता येते
- पारंपारिक खर्चापेक्षा खर्चात ८० ते ८५ % बचत
- पारंपारिक पद्धतीपेक्षा वेळेमध्ये ८५ ते ९५ % बचत

**प्रकाशक** : डॉ. तानाजी नरुटे
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २५०१/२०२२